जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २०.१२.२०२४**

**" बांगलादेश येथून भारतात घुसखोरी केलेल्या ०१ पुरूष व ०१ महिला बांगलादेशी यांना आडिवली, कल्याण येथुन अटक "**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की, तिरूपती भवन पॅराडाईज बिल्डींग, पहिला माळा, रूम नं.१०४, अनंता पाटील चौक, आडिवली, कल्याण पुर्व, जि.ठाण येथे बांगलादेश येथून भारतात घुसखोरी केलेले काही नागरीक कोणतेही अधिकृत कागदपत्रे नसताना भारतात अवैधरित्या प्रवेश करून वास्तव्य करीत आहेत.

सदर बातमीची खात्री व पाठपुरावा करून लागलीच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी यांनी एक पथक स्थापन करून दिनांक १९.१२.२०२४ रोजी ११.३५ वा. तिरूपती भवन, पॅराडाईज बिल्डींग, पहिला माळा, रूम नं. १०४, आडिवली, कल्याण या ठिकाणी सापळा रचुन ०१ बांगलादेशी पुरूष व ०१ महिला नामे १)मोहंमद सबुज सनोवर हसन, वय २४ वर्षे रा.तिरूपती भवन पॅराडाईज बिल्डींग, आडिवली, कल्याण. मूळ रा.गाव शेखशिमल, ठाणा घटेल, जि.तंगेल, राज्य ढाक्का, देश बांगलादेश व त्याची पत्नी २)बिस्टी सबुज हसन वय २४ वर्षे यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे भारतीय नागरीकत्वाविषयी कागदपत्राची मागणी केली असता त्यांच्याकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांच्याकडे भारतात येण्यासाठी लागणारे प्रवासी वैध कागदपत्रे नसल्याचे व त्यांनी अवैध मार्गाने भारत–बांगलादेश सिमेवरून लपत–छपत भारतीय सरहद्दीमध्ये प्रवेश करून मानपाडा पोलीस ठाणेच्या हद्दीत विनापरवाना भाडे तत्वावर रहात असल्याचे सांगितले.

सदर दोन्ही इसमांविरूध्द मानपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ।१३६०/२०२४ पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४ (अ), १४ (ब), १४ (क) तसेच घर मालक आरोपी मुस्तफा मुंशी याने त्याचे मालकीचे घर आरोपीत यांना ते बांगलादेशी आहेत हे माहित असताना देखील भाडयाने दिले म्हणून त्याचेविरूध्द विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोन्ही बांगलादेशी आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.धनाजी क्षिरसागर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी व त्यांचे पथकाने यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर